दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २३९ | MAHMAR/2006/17212 | रायगड | बुधवार, दि.२६ नोव्हेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## थंडी गायब आणि ढग दाटले

**दै.रायगड नगरी । मुंबई**


राज्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानात सातत्याने बदल होत असल्याचं चित्र आहे. कडाक्याच्या थंडीनंतर आता पावसाला पोषक हवामान निर्माण झालं असून उत्तरेकडील थंड वाऱ्यांचे प्रवाह कमी झाल्याने थंडी गायब झाली आहे. ढगाळ आकाशामुळे किमान तापमानात वाढ झाली असून, दुपारच्या वेळी उन्हाचा चटका जाणवत आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात थंडी कमी राहणार असून आज कोकण व मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी विजांसह हलक्या पावसाची शक्यता आहे.

सोमवारी धुळे येथील कृषी महाविद्यालयात राज्याचे नीचांकी १२.८ अंश तापमान नोंदवण्यात आलं आहे. राज्यात ६ अंशांपर्यंत आलेले किमान तापमान पुन्हा १२ अंशांहून अधिक झालं आहे. बहुतांश ठिकाणी तापमान १४ अंशांच्या वर गेल्याने थंडी गायब झाल्याचं पाहायला मिळत असून दुपारच्या वेळी उन्हाचा चटका तापदायक ठरत आहे. तसंच उकाडा जाणवू लागला आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात अनधिकृत बॉक्साईट उत्खनन तेजीत

### प्रादेशिक परिवहन विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष



**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन ।** यावर्षी लांबलेला पावसाळा संपल्यानंतर श्रीवर्धन तालुक्यामध्ये पुन्हा एकदा अनधिकृत बॉक्साइड उत्खनन तेजीत सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. बॉक्साइड उत्खनन करून अनेक व्यक्ती आपला उत्कर्ष साधत आहेत. परंतु यामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अनधिकृत उत्खनन अशाच प्रकारे सुरू राहिल्यास केरळमधील वायनाडच्या घटनेची पुनरावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही. बॉक्साइड उत्खनन करताना शासनाकडून अनेक नियम व अटी घालुन दिलेल्या असतात.

परंतु बॉक्साईटचे उत्खनन करणाऱ्या कंपन्यांकडून यापैकी कोणत्याही गोष्टीचे पालन केले जात नाही. ज्या ठिकाणी जमिनीमध्ये खोलवर ड्रिल मारून बॉक्साईड साठी ब्लास्ट घडविला जातो. त्या ठिकाणी बॉक्साइड काढून झाल्यानंतर पुन्हा माती भराव करून त्यावरती वृक्ष लागवड करणे बंधनकारक आहे. परंतु आजपर्यंत श्रीवर्धन तालुक्यात हजारो टन बॉक्साइडचे उत्खनन होऊन सुद्धा कुठल्याही कंपनीने पर्यावरणाशी आपली बांधिलकी जपलेली पाहायला मिळत नाही.

काही महिन्यापूर्वी बॉक्साइड उत्खननाची वा-हतूक करणाऱ्या काही टोळ्यांनी आपला असलेला पक्ष बदलून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात केवळ या धंद्यासाठीच प्रवेश केल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे. बॉक्साइडचे उत्खनन करण्यासाठी जे ब्लास्ट केले जातात, त्यानंतर त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची सुरक्षा सुविधा राबविली जात नाही. उत्खननासाठी ड्रिल केलेल्या बोगद्यात पावसाचे पाणी साठून श्रीवर्धन तालुक्यात देखील आगामी काळात मोठे भूस्खलन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र महसूल प्रशासनाकडून या बॉक्साइट उत्खनाकडे डोळेझाकच करण्याचे धोरण अवलंबिले जात आहे.

बॉक्साइडची अवजड वाहतूक क्षमतेपेक्षा जास्त घेऊन जाणारे मालवाहू ट्रक, गाडी भरलेली असताना अत्यंत कमी वेगाने घाट चढत असतात. परंतु रिकामी करून आल्यानंतर सदरच्या गाड्या अतिशय वेगाने येत असल्यामुळे अनेक वेळा अपघाताच्या घटना घडलेल्या आहेत. तसेच क्षमतेपेक्षा जास्त बॉक्साईड भरलेल्या गाड्यांचे अनेक वेळा अपघात होऊन त्यामध्ये चालकांना आपले प्राण देखील गमवावे लागले आहेत. मात्र या बॉक्साइडच्या अवजड वाहतुकीवर प्रादेशिक परिवहन विभाग पेण यांच्याकडूनही कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. कारण बॉक्साइडची वाहतूक करणाऱ्या माफी यांनी या सर्व यंत्रणांना आर्थिक तडजोडी मध्ये गुंतवून ठेवल्यामुळे अवजड वाहतुकीचा त्रास सामान्य नागरिकांना होत आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील मेघरे, सायगाव, कुरवडे, खुजारे या गावांच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावरती बॉक्साइड उत्खनन झालेले आहे व यापुढेही केले जाणार आहे. श्रीवर्धन तालुका सध्या पर्यटनासाठी पर्यटकांच्या पसंतीचे क्रमांक एकचे ठिकाण आहे. परंतु या ठिकाणाहून अशाच प्रकारे बॉक्साइड वाहतूक होत राहिली तर या ठिकाणचे निसर्ग सौंदर्य धोक्यात येईल व या ठिकाणी होणाऱ्या पर्यटन व्यवसायावर त्याचा गंभीर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. तरी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अनधिकृत उत्खनाबाबत तातडीने कारवाई करून या ठिकाणच्या वनसंपत्तीचा व पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही. याची दक्षता घेण्याची मागणी श्रीवर्धन तालुक्यातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## कोकणातील पाच समुद्र किनाऱ्यांच्या विकासासाठी २० कोटींचा निधी



**दै.रायगड नगरी । रत्नाकर पाटील**

**अलिबाग ।** ब्लू फ्लॅग पायलटचा दर्जा मिळाल्यानंतर त्या पाच समुद्रकिनाऱ्यांवर पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलली आहेत. त्यासाठी २० कोटींच्या प्रशासकीय खर्चाला राज्य शासनाने मान्यता दिली. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील कामांसाठी १ कोटी ४० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यात रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील ना-गाव आणि श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यांचा समावेश आहे.

डेन्मार्क येथील फाउंडेशन फॉर एन्व्हायर्नमेंटल एज्युकेशन संस्थेने प्रायोगिक तत्त्व-ावर समुद्रकिनाऱ्यावरील सुरक्षा, पर्यावरण संवर्धन, पाण्याची गुणवत्तेच्या निकषावर ब्ल्यू फ्लॅग पायलटचा दर्जा दिलेला आहे. यासाठी किनाऱ्यावरील शौचालये, पिण्याचे पाणी, पार्किंग, कपडे बदलण्याच्या खोल्या, पाळणाघरे, तात्पुरती दुकाने, कचराकुंडी, जीवरक्षक टॉवर, सौरदिवे, दिशादर्शक मंडळे, कचरा व्यवस्थापन, पथदिवे, सुरक्षा रक्षक, प्रवेश रस्ते इत्यादी मूलभूत सुविधा पुरवणे आवश्यक आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पर्यटन संचालनालयाने २०२५-२६ वर्षाच्या प्रादेशिक पर्यटन योजनेअंतर्गत पाच समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांना मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी २० कोटींची रक्कम मंजूर केला आहे. त्यामुळे भविष्यात रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला नवी झळाळी मिळणार असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या जीआरनुसार ही कामे उच्च दर्जाची असावीत. यासाठी, वास्तुशास्त्रीय तज्ज्ञ आणि विषय आधारित वास्तुविशारदांची नियुक्ती करावी, प्रत्यक्ष कामे प्रसिद्ध कंत्राटदारांद्वारे करावीत, असे निर्देश दिले आहेत. कामांची योग्य देखरेख आणि गुणवत्ता नियंत्रण केले पाहिजे. प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांसाठी निविदा प्रक्रिया त्वरित अमलात आणली पाहिजे आणि कामांसाठी प्रारंभआदेश तत्काळ जारी केले आहेत. तीन वर्षांच्या कालावधीत कामे पूर्ण करणे बंधनकारक असेल. एकदा प्रारंभ आदेश जारी झाल्यानंतर, काम प्रत्यक्षात सुरू झाल्यानंतर, कोणत्याही परिस्थितीत काम, कार्यकारी यंत्रणेत कोणतेही बदल करता येणार नाहीत. श्रीवर्धनसह महाराष्ट्रातील पाच समुद्रकिनाऱ्यांनी ‘ब्ल्यू फ्लॅग पायलट’ हा आंतरराष्ट्रीय दर्जा मिळाला आहे. समुद्र किनाऱ्याच्या सर्वांगीण विकासासाठी मिळालेले हे यश नक्कीच प्रेरणादायी आहे. भविष्यात किनाऱ्यांवर जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होतील. ज्यामुळे पर्यटनाबरोबर स्थानिक रोजगाराला चालना मिळेल, अशी आशा आहे.आदिती तटकरे, महिला व बालकल्याणमंत्री कोकणातील पाच समुद्र किनाऱ्यांना पहिल्यांदाच ब्लू फ्लॅग पायलटचा दर्जा मिळाल्याने येथील पर्यटन वाढीबरोबरच ते समृध्द होण्यास मदत होणार आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन आणि नागाव, रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर आणि लाडघर तसेच पालघर जिल्ह्यातील पर्णका या पाच किनाऱ्यांचा समावेश आहे. या पाचही किनाऱ्यांच्या पायाभूत सुविधा विकासासाठी प्रत्येकी ४ कोटी रुपये राज्य सरकारने मंजूर केले आहेत. त्यातील प्रत्येकी १ कोटी ४० लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

## तळोजा एमआयडीसीत ‘फाईब्रो कास्ट’ कंपनीला भीषण आग

**दै.रायगड नगरी । संजय कदम**

**पनवेल ।** तळोजा एमआयडीसीमधील ‘फाईब्रो कास्ट’ या कंपनीला सकाळी अचानक भीषण आग लागून मोठा आर्थिक नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे. धुराचे प्रचंड लोट आणि आगीच्या तीव्रतेमुळे परिसरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच तळोजा एमआयडीसी अग्निशामक दलाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत अनेक फायर टँकर्सच्या सहाय्याने आग नियंत्रणात आणली. तसेच आगीतून पसरणारा धूर आणि ज्वाळा रोखण्यासाठी अतिरिक्त दलाची मदतही घेण्यात आली. अखेर शर्थीच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र यंत्रसामग्री, तयार साहित्य व कच्चा माल जळून कंपनीचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून याबाबत तळोजा पोलीस तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाने स्वतंत्र तपास सुरू केला आहे. विजेच्या शॉर्टसर्किटची शक्यता नाकारण्यात आलेली नाही. दरम्यान, तळोजा एमआयडीसी परिसरात गेल्या काही महिन्यांपासून आग लागण्याच्या घटनांमध्ये सातत्य आल्याने औद्योगिक सुरक्षेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



### पनवेल बार असोसिएशनची त्रैवार्षिक निवडणूक जाहीर

## ११ जागांसाठी २५ नामनिर्देशनपत्र दाखल, २९ नोव्हेंबर २०२५ रोजी मतदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

न्यायालयीन कामकाजात वकील, अशील, कर्मचारी आणि न्यायालयात उद्भ-वणारे प्रश्न तसेच समस्या सोडवण्यासाठी काम करीत असलेली पनवेल वकील संघटना म्हणजेच पनवेल बार असोसिएशनच्या व्यवस्थापन समितीच्या जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२८’’ या कालावधीसाठी त्रैवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. शनिवारी २९ नोव्हेंबर २०२५ रोजी पनवेल दिवाणी न्यायालयाच्या नवीन इमारतीमधील वकील (बाररूम) दालनात मतदान होणार असून त्याच दिवशी त्याच ठिकाणी सायंकाळी निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

निवडणुकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सह सचिव (महिला राखीव), खजिनदार, ऑडिटर, सहखजिनदार प्रत्येकी एक तर दोन महिला राखीव कार्यकारिणी सदस्य तसेच दोन सर्वसाधारण कार्यकारिणी सदस्य अशी एकूण अकरा पदाधिकाऱ्यांच्या कार्यकारी मंडळाची निवड करण्यात येणार आहे. संघटनेच्या नोंदणीकृत १५८५ वकील सभासदांच्या पैकी ११६३ मतदार उमेदवारांना मतदान करणार आहेत. निवडणुक प्रक्रिया पार पाडण्यासाठी जेष्ठ वकील ॲड. एच. जे. शेळके यांची मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून पनवेल बार असोसिएशनच्या वतीने नेमणूक करण्यात आली आहे.

अकरा जागांसाठी घेण्यात येणाऱ्या निवडणुकीत २५ उमेदवारांनी आ-पले उमेदवारी अर्ज दाखल केले असून यापैकी सात महिलांनी प्रतिनिधित्व सिद्ध करण्यासाठी नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत. अध्यक्ष पदासाठी ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ आणि ॲड. रत्नदीप राम पाटील, उपाध्यक्ष पदासाठी ॲड. संतोष जोमा म्हात्रे तसेच ॲड. सचिन अंबाजी म्हात्रे, सचिव पदासाठी ॲड. प्रल्हाद घनश्याम खोपकर आणि ॲड. नित्यानंद राम ठाकूर, सहसचिव ( महिला राखीव ) पदासाठी ॲड. हेमा सिताराम भगत आणि ॲड. दिपाली रामदास गावंड, खजिनदार पदासाठी ॲड. धनराज कान्हा तोकडे आणि ॲड. महेबूब गैबी पटेल, सहखजिनदार पदासाठी ॲड. विशाल लक्ष्मण डोंगरे आणि ॲड. हेमंत गंगाधर शिंदे तसेच ॲड. रोहिदास हरी आगलावे, ऑडिटर पदासाठी ॲड. भूषण मोरेश्वर म्हात्रे आणि ॲड. भास्कर रामचंद्र पाटील कार्यकारिणी सदस्य पदासाठी ॲड. विजयेंद्र नारायण मुंढे, ॲड. इर्शाद रमझान शेख, ॲड. आशिष विजय पनवेलकर, ॲड. जयसिंग जगन्नाथ शेरे, ॲड. नागेश अरविंद हिरवे तथा कार्यकारिणी सदस्य (महिला राखीव) पदासाठी ॲड. ज्योती पी. राऊत - उरणकर, ॲड. समीना साजिद खान, ॲड. दिपाली रवींद्र बोहरा, ॲड. छाया रामदास म्हात्रे, ॲड. अस्मिता नंदकिशोर भुवड यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

या निवडणुकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव ( महिला राखीव), खजिनदार, ऑडिटर या पदांसाठी प्रत्येही दोन उमेदवार असल्याने यांच्यात सरळ लढत होणार असून सहखजिनदार पदासाठी तिहेरी लढत होणार आहे. त्याचप्रमाणे दोन कार्यकारिणी सदस्य आणि दोन महिला राखीव कार्यकारिणी सदस्यपदांसाठी अनुक्रमे पाच पाच उमेदवार रिंगणात आहेत.

## उरणमध्ये विद्युत पोलांना मातीचा आधार

### भविष्यात नागरिकांच्या जीवितास धोका



**दै.रायगड नगरी । अनंत नारंगीकर**

**उरण ।** उरण तालुक्यातील वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याचे काम केले आहे.मात्र महावितरण कार्यालयाच्या भ्रष्ट कारभारांनी उरणमधील विद्युत पोल उभे करण्यासाठी सर्रास सिमेंट ऐवजी मातीचा वापर केला आहे.त्यामुळे भविष्यात विद्युत वाहक पोल पडून अपघात होऊन नागरिकांच्या व त्या ठिकाणांहून ये-जा करणाऱ्या गायी, म्हशी यांच्या जीवातास धोका निर्माण होणार आहे.तरी राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणच्या भ्रष्ट कारभाराची दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

वाढते औद्योगिकीकरण आणि अटल सेतू, नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यामुळे उरण तालुक्याचे नागरिकरण झपाट्याने वाढत आहे.त्यामुळे याठिकाणा वरील विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी राज्य सरकारने महावितरण विभागाला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याचे काम हे आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून केले आहे.मात्र महावितरण कार्यालयाच्या भ्रष्ट कारभारांनी उरणमधील विद्युत पोल उभे करण्यासाठी सर्रास सिमेंट ऐवजी मातीचा वापर केला आहे.तसेच विद्युत वाहक लोखंडी पोलांना आधार देण्याचे काम ही केले जात नाही. त्यामुळे मातीत उभे करण्यात आलेले लोखंडी पोल लवकरात लवकर सडण्याचा धोका अधिक आहे.एकंदरी पावसाळ्यात,वादळात विद्युत वाहक पोल पडून अपघात होऊन नागरिकांच्या व त्या ठिकाणांहून ये-जा करणाऱ्या गायी, म्हशी यांच्या जीवातास धोका निर्माण होणार आहे.तरी राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उरण येथील महावितरणच्या भ्रष्ट कारभाराची दखल घेऊन कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अलविदा, ‘ही–मॅन’!

‘मर्द बनने के लिए, शरीर नहीं, हिंमत चाहिए’, असे त्याच्या खास स्टाइलमध्ये सुनावणाऱ्या धर्मेंद्रने पडद्यावरच्या पुरुष प्रतिमेला वेगळीच उंची आणि खोली दिली! हा नायक दणकट होताच, पण त्याच्या डोळ्यांत हळवी सच्चाई होती. वेडाची झाक होती. प्रेमात आकंठ बुडालेला हा नायक त्यासाठी काहीही पणाला लावायला तयार होता, असा धर्मेंद्र आता आपल्यात असणार नाही, ही कल्पनाही असह्य आहे. सहा दशकांहून अधिक काळ रूपेरी पडदा गाजवत बॉलिवूडचा ‘ही–मॅन’ बनलेल्या धर्मेंद्र अर्थात धरम पाजी तथा धर्मेंद्रसिंह देओल यांच्या ‘एक्झिट’नं हिंदी सिनेमाचं एक युग संपलं. अस्सल पंजाबी जाटांचं मर्दानी सौंदर्य, भरभक्कम देहयष्टी, खास गडगडाटी संवादशैली आणि डोळ्यांतून व्यक्त होणारा अंगार, हे धर्मेंद्र यांचं वैशिष्ट्य. त्यामुळंच अवघ्या चित्रपटसृष्टीनं ‘गरम धरम’ ही उपाधी बहाल केलेली. ती सार्थ करत तीनशेवर चित्रपटांमधून (त्यातही तब्बल ४३ ब्लॉकबस्टर) त्यांनी सिनेरसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवलं. १९६० मध्ये ‘दिल भी तेरा, हम भी तेरे’नं सुरुवात झाली, पण १९६६च्या ‘फूल और पत्थर’नं धर्मेंद्र यांना हिंदी सिनेमाचा पहिला ‘सोलो क्शन हिरो’ बनवलं. सत्तरच्या दशकात त्यांनी बॉक्स ऑफिसवर राज्य केलं. १९७१ ते १९७५ पर्यंत सलग पाच वर्षं सर्वाधिक कमाई करणारे ते अभिनेते होते. हा विक्रम आजही अबाधित आहे! ‘सीता और गीता’, ‘आया सावन झूम के’, ‘जुगनू’, ‘यादों की बारात’, ‘चुपके चुपके’, ‘प्रतिज्ञा’, ‘द बर्निंग ट्रेन’, ‘मेरा गाव मेरा देश’ यातून त्यांची बहुआयामी प्रतिभा दिसली. पण, खरा धमाका त्यांनी सत्तरच्या दशकात ‘शोले’मध्ये ‘वीरू’ साकारत केला. अमिताभ बच्चनच्या ‘जय’सोबत त्यांचा दोस्तीचा गहिरा रंग पडद्यावर इतका नैसर्गिक वाटला की, ‘ये दोस्ती हम नहीं तोडेंगे’ हे गाणे आणि त्यांचे संवाद हिंदी सिनेमाच्या इतिहासातील मैलाचे दगड ठरले. ‘शोले’नंतर ‘धरमवीर’, ‘चरस’, ‘स्वर्ग नरक’, ‘हुकुमत’ अशा क्शनपटांतून तर त्यांनी ‘बॉलिवूडचा ‘ही–मॅन’ अशी नाममुद्रा उमटवली. याच दशकात हा सुपरस्टार जणू एखाद्या ज्वालामुखीसारखा उफाळून आला. स्टायलिश पँटमध्ये खोचलेला रंगीत फुलाफुलांचा शर्ट, रूंद पट्टा किंवा साध्या कुर्त्या–पायजम्यात त्यांचं राजबिंडं रूप खुलायचंच, पण खाकी युनिफॉर्म किंवा बंदुकीचा पट्टा खांद्यावर घेतलेल्या डाकूच्या घोळदार धोतर–सदऱ्यातच धर्मेंद्र नावाचा खरा ‘ब्रँड’ नावारूपाला आला. त्यांच्या डोळ्यांतली आग आणि रक्त तापायला लावणाऱ्या डॉयलॉगवर तेव्हाची तरुणाई फिदा होती. ‘बसंती, इन कुत्तों के सामने मत नाचना!’ किंवा ‘कुत्ते, कमिने, मैं तेरा खून पी जाऊंगा’ अशा जबरी संवादांवर सिंगल स्क्रीन थिएटरच्या गॅलरीतून टाळ्या आणि शिट्ट्या एकदम उसळायच्या. धर्मेंद्र आणि हृषीकेश मुखर्जी हे अभिनेता–दिग्दर्शकाचं ‘कॉम्बिनेशन’ त्यावेळी परफेक्ट मानलं गेलं होतं! हृषीदांनी धर्मेंद्र यांच्यातला वेगळाच पैलू बघितला. संवेदनशील, संकोची, ग्रामीण पार्श्वभूमीचा आणि हळुवार माणसाचा! ‘अनुपमा’, ‘सत्यकाम’, ‘चुपके चुपके’ यातून हृषीदांनी धर्मेंद्र यांच्यातला अभिनेता बाहेर काढला. ‘सत्यकाम’सारख्या कलात्मक चित्रपटातही धर्मेंद्र यांच्या डोळ्यांतली आग लपत नव्हती. त्यांना संयत अभिनय येतच नव्हता जणू, पण ही मर्यादाच त्यांचं वैशिष्ट्य बनली. प्रेक्षक त्यांना त्या प्रचंड ऊर्जेसाठी पाहायला यायचे. पुढे ऐंशीच्या दशकात त्यांनी कमी बजेटच्या क्शन चित्रपटांची मालिकाच काढली. ते एकटेच शंभर गुंडांना ठोकायचे! नंतर मोठा मुलगा सनी देओलच्या पदार्पणासाठी ‘बेताब’, तर धाकट्या बॉबीसाठी ‘बरसात’ची निर्मिती केली. वयाच्या नव्वदीत ‘अपने’, ‘यमला पगला दिवाना’, ‘रॉकी और रानी की प्रेम कहानी’ यातून दोन्ही मुलांसोबत पडद्यावर धमाल उडवून दिली. रूपेरी पडद्यावर चमकत असताना त्यांनी राजकीय क्षेत्रही आजमावून पाहिलं. २००४ मध्ये ते भारतीय जनता पक्षाकडून बिकानेरमधून लोकसभेवर निवडून गेले खरे; पण संसदेतली त्यांची हजेरी अत्यल्प राहिली. धर्मेंद्र केवळ अभिनेते नव्हते, तर भारतीय संस्कृतीचे खरेखुरे प्रतिनिधी होते. जगण्याचा भरभरून आनंद घेणारा हा ‘पंजाबी पुत्तर’ नव्वदीतही सोशल मीडियावर सक्रिय होता. मातीतला माणूस आणि सुपरस्टार यांचा झकास मेळ घालणारा असा सच्चा, साधा, सशक्त आणि सेंद्रिय अभिनेता पुन्हा चित्रपटसृष्टीला लाभणं कठीणच. धर्मेंद्र आपल्यातून गेले असले, तरी ‘ही–मॅन’ नावाची ही ‘फँटसी’ जगाच्या अंतापर्यंत कायम राहणार आहे!

# कलगी–तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई मार्फत पत्रकार रघुनाथ भागवत यांना पुरस्कार जाहीर

**दै.रायगड नगरी । निलेश लोखंडे**

**महाड ।** रायगड जिल्ह्याच्या महाड खाडीपट्टा येथील दै.पुढारी वृत्तपत्राचे प्रतिनिधी पत्रकार रघुनाथ भागवत यांना नुकताच कलगी–तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई, या संस्थेमार्फत कलगी–तुरा आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर झाला असून पुरस्कार वितरण सोहळा ७ डिसेंबर २०२५ रोजी भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृह, मीरारोड येथे आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती संस्थेचे सरचिटणीस संतोष धारशे यांनी दिली.



पत्रकार रघुनाथ भागवत यांनी दै. कुलाबा शिवतेज या कोकणातील नामांकित वृत्तपत्रातून सुरुवात करून पुढे त्यांनी दै. रत्नागिरीच्या रायगड टाइम्स आवृत्ती, दैनिक सागर, दै. अग्रलेख यांच्यासह महाराष्ट्रातील अग्रगण्य दै. पुढारी वृत्तपत्रामध्ये गेली नऊ वर्षे कार्यरत आहेत. नुकतेच त्यांनी पत्रकारितेच्या डिग्रीचा अभ्यासक्रम पूर्ण करून प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या परखड, निर्भीड व नि:पक्ष पत्रकारितेने महाड खाडीपट्टयासह कोकणातील विविध संस्थांच्या जडणघडणीमध्ये मोठे योगदान राहिले आहे. त्यांनी केलेल्या बेधडक लिखाणामुळे अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. आपल्या भागातील समस्या, प्रलंबित प्रश्न यांचा अभ्यास करून बातमीच्या माध्यमातून आ–वाज उठवून संबंधित यंत्रणेला समस्या सोडवण्यासाठी भाग पाडले आहे ज्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागले, अनेकांना न्याय मिळाले, विकास कामे मार्गी लागली.

त्यांच्या समाजसेवेची नोंद घेऊन पत्रकारीता क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल तसेच उल्लेखनीय समाज कार्याबद्दल कोकण प्रांतातील कलगी–तुरा लोककलेचे जतन–संवर्धन तसेच शाहिरी लोकवंताच्या उन्नतीसाठी मागील ६५ वर्षांपासून अविरत कार्यरत असलेल्या आणि सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि अध्यात्मिक क्षेत्रांत कार्यरत असलेल्या संस्थेच्या वतीने कलगी–तुरा आदर्श पत्रकार पुरस्कार २०२५ या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे असल्याचे पुरस्कार आयोजित संस्थेच्या पदाधिकारींनी माहिती देताना सांगितले.

पत्रकार रघुनाथ भागवत यांना यापूर्वी भार्गव प्रतिष्ठानचा पत्रकारितेतील जीवनगौरव पुरस्कार, अखंड हिंदुस्तानमधील सहभागी असणाऱ्या पुणे येथील साळी समाजाचा पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार तसेच महाड पत्रकार संघ (रजि.) यांच्याकडून सन्मान, कोविड योद्धा पुरस्कार, काव्यनिनाद साहित्य मंच, पुणे यांच्याकडून उत्कृष्ट काव्य लेखन, उत्कृष्ट अभंग लेखन, चारोळी सम्राट पुरस्कार, सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड महाड यांच्याकडून सन्मान अशा विविध सामाजिक संघटनांकडून सन्मान, सत्काराने गौरविण्यात आले आहे.

# पोस्कोच्या सामाजिक बांधिलकीतून आरोग्य सेवा: ३२८ मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण

**दै.रायगड नगरी । पद्माकर उभारे / संतोष सुतार**

**माणगाव ।** ग्रामीण भागांमध्ये मोतीबिंदू सारख्या आजाराकडे दुर्लक्ष होत असताना, पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने गेल्या काही वर्षांत समाजासाठी आशेचा किरण ठरलेला एक उपक्रम सातत्याने राबवला आहे. कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया मोहीम गेल्या काही वर्षांपासून कंपनीच्या आसपासच्या पाच ग्रामपंचायती (भागाड, विळे, वरचीवाडी, सणसवाडी, साजे) मध्ये राबवण्यात येत असून, या उपक्रमाद्वारे या भागातील नागरिकांच्या जीवनात प्रत्यक्ष प्रकाश फुलवण्यात कंपनीला यश आले आहे.

या वर्षी घेतलेल्या मोतीबिंदू तपासणी शिबिरांना नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला. तपासणीत मोतीबिंदू निदान झालेल्या एकूण ९० मोफत शस्त्रक्रिया कंपनीच्या सी.एस.आर. उपक्रमांतर्गत करण्यात आल्या आहेत. या ९० शस्त्रक्रियांमुळे अनेक जेष्ठ नागरिकांना पुन्हा स्वच्छ दृष्टी प्राप्त झाली आहे. मागील काही वर्षांचा विचार केल्यास, या उपक्रमाद्वारे एकूण ३२८ मोतीबिंदू शस्त्रक्रिया पूर्णपणे विनामूल्य करण्यात आल्या आहे – आणि हा आकडा सामाजिक बांधिलकीचा आणि मानवी संवेदनशीलतेचा ठोस पुरावा ठरतो.

या संपूर्ण उपचार प्रक्रियेत रुग्णांची फक्त तपासणीच केली जात नाही, तर त्यांचा संपूर्ण प्रवास कंपनीकडून नियोजनबद्ध पार पाडला जातो. प्राथमिक तप–ासणी, हॉस्पिटलमध्ये ने–आण, तज्ज्ञ डॉक्टर्समार्फत शस्त्रक्रिया, औषधे, तसेच ऑपरेशननंतरची काळजी, चष्मा – या सर्व सुविधा पोस्को महाराष्ट्र स्टीलकडून पूर्णपणे मोफत पुरविल्या जातात. विशेष म्हणजे शस्त्रक्रियेनंतर कंपनीचे अधिकारी स्वतः रुग्णांच्या घरी भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची पाहणी करतात व चष्मा वाटप करतात. ग्रामीण भागातील नागरिकांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधानच या उपक्रमाचे खरे यश आहे. अनेक कुटुंबांना या सुविधेमुळे मोठा आर्थिक दिलासा मिळाल्याचाही अनुभव सांगितला आहे.

आरोग्यासारख्या मूलभूत गरजांमध्ये हातभार लावून कंपनीने समाजाशी आपले नाते अधिक दृढ केले आहे. ग्रामीण भागातील आरोग्यसेवा सहज उपलब्ध व्हावी, कोणाकडे पैशांच्या अभावामुळे उपचार थांबू नयेत आणि प्रत्येकाला स्वच्छ दृष्टीचा हक्क मिळावा – याच विचारांनी हा उपक्रम पुढे नेला जात आहे.

कंपनीचा संकल्प स्पष्ट आहे – या उपक्रमातून पुढील काळात अधिक नागरिकांना मोफत उपचार उपलब्ध करून देणे, आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात शक्य तितका प्रकाश पोहोचवणे. मोतीबिंदूमुळे दृष्टीतील कमतरता अनेकांना अपंग / अवलंबित्व आणते अश्या स्थितीत कंपनीने यासंदर्भात घेतलेले हे पाऊल अभिनंदनीय आहे असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.



# सद्गुरू श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जत तर्फे रक्तदान

**दै.रायगड नगरी । कर्जत**

सद्गुरू श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जत तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, ७७ रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय,सामाजिक व मानवतावादी कार्य केले आहे

कर्जत – खालापुर तालुक्यातील ५२९ वे रक्तदान शिबिर सद्गुरू श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जत, आवळस, कोंदिवडे, कडाव, दहिवली, नेरळ यांच्या संयुक्त विद्यमाने व घाटकोपर येथील समर्पण रक्त केंद्र यांच्या सहकार्याने श्री शनी मंदिराच्या रविकिरण सभागृहात संपन्न झाले. याप्रसंगी सदगुरू श्री अनिरुद्ध उपासना केंद्राचे उपस्थित सर्व सेवकांनी सामुदायिक प्रार्थना करुन रक्तदान शिबिराला सुरूवात केली. उत्पल देशमुख या रक्तदात्यांने प्रथम रक्तदान केले. रक्तदान शिबिराचा शुभारंभ केला.

# चिरनेर–कातळपाडा येथे अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथे उभारण्यात आलेल्या दत्त मंदिरात दि. ४ डिसेंबर रोजी, साजऱ्या होणाऱ्या श्री दत्तजयंती उत्सवानिमित्ताने, काल पासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा अखंड हरिनाम सप्ताह ३० नोव्हेंबर पर्यंत श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायण सोहळा भगवंताच्या अधिष्ठानाने, सद्गुरु माऊली हसुराम बाबा यांच्या कृपाशीर्वादाने, संतांच्या चिंतनाने आणि गुरुकुलाच्या सहकार्याने ह भ प गजानन महाराज, ह भ प चिदानंद महाराज, ह भ प मदन महाराज व दात्यांच्या सहकार्याने व्यासपीठ चालक ह भ प अनिल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याची माहिती ह भ प दत्तात्रेय महाराज यांनी दिली.

यामध्ये शनिवार २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता दीपोत्सव–ाचा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. दरम्यान या अखंड हरिनाम सप्ताहात काकडा, वाचन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन अशा धार्मिक कार्यक्रमांबरोबर श्री सांप्रदाय नरेंद्र महाराज व सद्गुरु माऊली हसूराम बाबा यांच्या सांप्रदायाचे कार्यक्रम सुरू झाले आहेत. आश्लेषा केणी महाराज या दहा वर्षाच्या कीर्तनकार चिमुरडीने सोमवारी सादर केलेल्या कीर्तनातून भाविकांना मंत्रमुग्ध केले.तर प्रवचनकार प्रभाकर महाराज, मुकुंद महाराज ,दि पाताई म्ह–ात्रे, विलास महाराज, विश्वास महाराज, नथुराम परदेशी, रमेश महाराज तसेच कीर्तनकार एकनाथ महाराज ,अश्लेषा केणी महाराज, हिराजी महार–ाज, दिपाली जाधव, निळकंठ महाराज, नंदकुमार महाराज, महेश महाराज यांचे प्रवचन व कीर्तनाचे कार्यक्रम सुरू असून दत्त मंदिराच्या भव्य प्रांगणात भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

रविवार ३० नोव्हेंबर रोजी सकाळी दहा वाजता अनिल महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. विश–ेषता: या अखंड हरिनाम सप्ताहासाठी अन्नदाते आणि देणगीदार या सर्वांचे अखंड सप्ताह मंडळाकडून आभार व्यक्त केले जात आहेत. सद्गुरु माऊली हसूराम बाबा हरिपाठ मंडळ तसेच चिरनेर भोम यांच्यासह दत्त मंदिर कातळपाडा आजी माजी कमिटी, हरी स्मरण वारकरी संप्रदाय या सर्वांकडून अखंड हरिनाम सप्ताहाचे व्यवस्थापन केले जात असल्याची माहिती कातळपाडा ग्रामस्थांनी दिली.


## पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१०२०६
## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत मौजे– धरणाकॅम्प येथील सर्व्हे नं. २० व २१ पासून ते मौजे धानसर येथील सर्व्हे नं. १५६ पर्यंत ३०.०० मी. रूंदीच्या तसेच मौजे– धानसर येथील सर्व्हे नं. १४० पासुन ते सर्व्हे नं. १३३ पर्यंत १५.०० मी. रुंदीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये दि. २५/०६/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजनानुसार नियोजित रस्त्यामधील मौजे– धानसर येथील सर्व्हे नं. १७१/२अ व १७१/२/ब प्रस्तावित १५.०० मी. व ३०.०० मी. रुंदीचे क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन मौजे धानसर, ता. पनवेल येथील मे. समसिद्धी रिअल्टर्स यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील प्रस्तावित १५.०० मी. व ३०.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र पुढीलप्रमाणे :–

१) मौजे– धानसर, सर्व्हे नं. १७१/२अ व १७१/२/ब रस्त्यासाठी बाधीत २१५४.७७७ चौ. मी.

त्यास मोजणी नकाशानुसार चतु:सीमा खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| पुर्वेस : | लागून गट नं. १७१/१, १७५, १३३ |
| पश्चिमेस : | लागून गट नं. १६९ (२), १६९ (३) |
| दक्षिणेस : | लागून गट नं. १७०, १७१(४), १७२ |
| उत्तरेस : | लागून गट नं. १६८, १६७ |

टिप :– उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

**सही/–**
**सहाय्यक संचालक, नगररचना**
**महानगरपालिका पनवेल**

जा क्र. पमपा/नरवि/टिडीआर/२६–२५/१२६०/२०२५ दि.२५/११/२०२५



## महाराष्ट्र शासन
## जलसंपदा विभाग

कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि. रायगड
दूरध्वनी क्र. ०२१९४ – २५०८५७ email-eerid24@gmail.com

**दर मागणी पत्रक सूचना सन २०२५–२६**

मा. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड ४०२३०४ (दुरध्वनी क्र.०२१९४/२५०८५७) हे अनुभवी व इच्छुक संस्थेकडुन खालील नमुद परिशिष्ठातील बाबींचे दर खाजगी अभिकरणामार्फत दरपत्रक मागवित आहेत. सदर दरपत्रक इच्छुक संस्थेने शासनाचे संकेतस्थळ https:/wrd.mahatenders.gov.in येथून दि.२५/११/२०२५ ते दि.०२/१२/२०२५ पर्यंत डाऊनलोड करुन सदर दर पोष्टाने/हस्तेपोहच सादर करावीत. तसेच दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड यांनी राखून ठेक्ला आहे. अट असलेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

| Sr. No. | Item | Unit | Rate (in Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | Preparation of Emergency Action Plan | Job | |
| | i) Collection of DEM for the probable inundation area from reliable sources and conducting Dam break analysis | | |
| | ii) Collecting required Data from I.M.D. and Revenue including necessary fees | | |
| | iii) Preparation of inundation mapping as per CWC guidelines with HecRas or similar software with planning of escape routes for all important inundation places. | | |
| | iv) Preparing detailed EAP report as per templates given in guidelines of CWC manual. | | |
| | v) Submission of Two copy of preliminary EAP report for checking and Approval of competent authority. | | |
| | vi) After approval ti the preliminary EAP report and after sincorporating necessary corrections and suggestions as per the approval copy, ten copies of Final report with a soft copy shall be prepared and submitted to the Engineer in charge. | | |

१. दरपत्रक केवळ अंदाजपत्रक बनविण्याच्या उद्देशाने मागविण्यात आलेले आहे. दरपत्रक निविदेची किंवा कामाची हमी देत नाही.

२. कामाबाबत अधीक माहिती आवश्यक असल्यास ती आपणास रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात येईल.

३. नमुद केलेले दर हे सर्व करांसहित असावेत.

**सही/–**
**(इंजि. मिलींद पवार)**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड पाटबंधारे विभाग,**
**कोलाड.**

क्र.जिमाका/राअ/जाहि/२९३/२०२५


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पोलादपूर नगरपंचायतीमध्ये स्नेहा स. मेहता यांनी स्विकारला नगराध्यक्ष पदाचा कार्यभार

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर ।** नगरपंचायत पोलादपूरच्या नगराध्यक्ष पदाचे राजीनामे आणि नव्याने कार्यभार स्विकारण्याच्या संगीत खुर्चीचा खेळ सुरू असून दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर महिला आरक्षण नगराध्यक्ष पदासाठी तिसऱ्या नगरसेविका स्नेहा सचिन मेहता यांना शिवसेना पक्ष संघटनेच्या वतीने संधी देण्यात आली आहे. यानंतरही हा सत्तेच्या संगीत खुर्चीचा खेळ पुढील तिर्सय़ा पंचवार्षिक निवडणुकीत थेट महिला नामाप्र नगराध्यक्षपदासाठी देखील निवडणुकीचा समावेश असल्याने दुसरा पंचवार्षिक कालावधी संपल्यानंतर थांबण्याची लक्षणे दिसत आहेत.

शिवसेना पक्ष संघटनेच्या निर्णयानुसार शिल्पा देवेंद्र दरेकर यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त नगराध्यक्षपदासाठी स्नेहा सचिन मेहता यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५ रोजी पोलादपूर नगरपंचायत मुख्याधिकारी विनय शिपाई यांच्याकडे निवडणूक कार्यक्रमानुसार दाखल करण्यात आले. या नामनिर्देशन पत्राची छाननी पिठासन अधिकारी महाड उपविभागीय अधिकारी पोपट ओमासे यांच्याकडून करण्यात आली. यानंतर नगराध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारण्याची औपचारिकता २५ नोव्हेंबरला होणार हे निवडणूक कार्यक्रमानुसार निश्चित झाले.

आज मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी सव्वा बारा वाजता पोलादपूर नगरपंचायत शिवसेना पक्षाचे गटनेते मनोज प्रजापती, उपनगराध्यक्ष प्रसाद इंगवले, नगरसेवक नागेश पवार, सिद्धेश शेठ, विनायक दीक्षित, निखिल कापडेकर, सोनाली गायकवाड, शिल्पा दरेकर, अस्मिता पवार, स्वीकृत नगरसेविका मृगया शहा आदी नगरसेवक नगरसेविका यांच्या उपस्थितीत स्नेहा मेहता यांनी नगराध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारला.



पोलादपूर नगरपंचायतीमध्ये पहिल्या नगराध्यक्षा अश्विनी गांधी त्यानंतर सुनीता पार्टे, नागेश पवार, प्रकाश गायकवाड, राजन पवार, सोनाली गायकवाड, शिल्पा दरेकर आणि आता स्नेहा मेहता या आठव्या नगराध्यक्षा झाल्या आहेत. यानंतरही नगराध्यक्ष पदाचा संगीत खुर्चीचा खेळ सुरू राहणार आहे. त्यामुळे दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीनंतर नवव्या नगराध्यक्षा म्हणून अस्मिता उमेश पवार यांना संधी मिळून त्यांच्या कालावधीत तिर्सय़ा पंचवार्षिक निवडणुकीला सत्ताधारी शिवसेना पक्ष सामोरा जाईल.

तिर्सय़ा पंचवार्षिक निवडणुकीवेळी थेट नगराध्यक्ष पदाची निवडणूक देखील होणार असून नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला उमेदवारासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. त्या थेट नगराध्यक्ष पदाची निवडणूक सध्या सुरू असलेला संगीत खुर्चीचा खेळ थांबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

### रस्ते दुरूस्तीमुळे नागरिकांमध्ये समाधान

# महापालिकेच्या चारही प्रभागात रस्ते दुरूस्तीच्या कामांना वेग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महापालिकेच्या चारही प्रभागतील रस्ते दुरूस्तीच्या कामांना वेग आला असून रस्ते दुरूस्तीच्या कामांमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या आदेशानूसार चारही प्रभागातील रस्ते दुरूस्तीच्या कामांवर बांधकाम विभागाने लक्ष केंद्रीत केले आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी कनिष्ठ अभियंता रात्रंदिवस रस्ते दुरूस्तीची कामे करत आहेत.

सध्या महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे स्वतः विविध ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन कामाची पाहाणी करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देत आहेत. शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागामध्ये रस्ते दुरूस्तीची कामे केली जात आहे. खारघर येथील सेक्टर ३५डी मधील रस्ता दुरूस्ती काम सुरू आहे.

याचबरोबर कामोठ्यामधील सेक्टर १० मधील रस्ते दुरूस्तीचे काम वेगाने सुरू आहे. नवीन पनवेलमध्ये सेक्टर ४ , सेक्टा १९, सेक्टर १मध्ये रस्ते दुरूस्ती जोमाने सुरू आहे. याचबरोबर कळंबोली मधील बालाजी स्कूल जवळील रस्त्याची कामे व सेक्टर १७ मधील रस्ते दुरूस्तीची कामे सुरू आहेत. याचबरोबर नवीन पनवेलमधील डीमार्ट रस्त्याचे काम पूर्ण होत आले आहे.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे सजा-जुई/ता. उरण/पनवेल, जि. रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या जमिनीचे सर्व मालकी हक्क माझे अशिल यांनी जमीन मिळकतीच्या मालकाकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर वर्णन व विद्यमान कब्जेदरांची नावे खालील प्रमाणे

वर्णन

मौजे - जुई (५५३३३०) ता. उरण, जि. रायगड

PU-ID: 35110325931 खाता क्र: ५१० भोगवटदार वर्ग १

| भोगवटादाराचे नांव | सर्व्हे क्रं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|
| दिपक मधुकर कदम वगैरे | १५१ | ३<br>एकूण पैकी | ०-४५-३०<br>०-६८-००<br>१-१३-३०<br>०-२६-०० | ३.५२ |

वरील मिळकत ही एकूण १.१३.३० क्षेत्रापैकी भोगवटादार श्री. दिपक मधुकर कदम व इतर यांच्या नावे आणि मालकीची असलेली ०.२६०० गुंठे इतक्या क्षेत्रफळाची जमीन माझे मालकीची असलेली परवानगी मिळवून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणचाही गहाण, दान, बोजा, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, टस्टी, पोटगी, वारसा, भाडेपटटा, वहीवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने, कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकतीसंदर्भात माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

उरण
दि.२६/११/२०२५

सही/-
**श्री.प्रसाद एन. पाटील**
**ॲडव्होकेट**

**ए-विंग, ४०३, तुलसी सोनाटा, चॅनल उपवन जवळ, साईनगर (प.), पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, पिनकोड-४१०२०६**
**मो.नं.९७०२०८२६६९**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे- नगदी सापोली, तालुका- पेण, जिल्हा- रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत ही १) मनीषा नाना उतेकर, २) अनुबाई काथार म्हात्रे, ३) जगन्नाथ धाऊ पाटील, ४) गणेश धाऊ पाटील, ५) रमेश धाऊ पाटील, ६) माधुरी मोरेश्वर भोईर ७) रंजना विलास म्हात्रे, ८) ठकुबाई नामदेव पाटील, ९) दामोदर नामदेव पाटील, १०) आशा प्रमोद पाटील, ११) माणकीबाई बुध्या पाटील, यांची वडिलोपार्जित मालकीची मिळकत आहे.

**सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे: -**
**मौजे : नगदी सापोली, ता. पेण, जिल्हा.रायगड**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | पो.ख. | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|---|
| नगदी सापोली | ५ | ३/अ | ०.३८.२० | ०.०१.२० | ०.३९.४० | ६.२६ |

नमुद केलेली मिळकत ही वरील कब्जेदारांच्या मालकी हक्कात व कब्जे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबद्दल विद्यमान मालकाने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनचिठ्ठी, साठेकरार, खरेदीखत, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्गेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकीत दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या हरकती खालील पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहित धरून तसेच त्यासंबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरण्यात येईल, तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात घेतलेली हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हे सर्वांस कळावे.

सदरची पेपर नोटीस देण्यात माझी कोणत्याही प्रकारची अडचण किंवा तक्रार नाही, म्हणून मी या जाहीर नोटीसीवर सही करत आहे.

ठिकाण : पेण
दि.२५/११/२०२५

सही/-
**ॲड.हिंदवी पाटील**
**मो.नं.९३२६७९७२००**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे सजा हरिश्चंद्र पिंपळे / ता. उरण/पनवेल, जि. रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या जमिनीचे सर्व मालकी हक्क माझे अशिल यांनी जमीन मिळकतीच्या मालकाकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर वर्णन व विद्यमान कब्जेदरांची नावे खालील प्रमाणे

वर्णन

मौजे - हरिश्चंद्र पिंपळे, ता. उरण, जि. रायगड

PU-ID: 29354270468 खाता क्र: २९१

| भोगवटादाराचे नांव | सर्व्हे क्रं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|
| शेखर तुकाराम मोकल संतोष तुकाराम मोकल | १८ | २<br>एकूण पैकी | १-०५-५०<br>०-०४-००<br>१-०९-५०<br>०-३२-५० | १२.५० |

वरील मिळकत ही एकूण १.०९.५० क्षेत्रापैकी भोगवटादार श्री. शेखर तुकाराम मोकल व १ यांच्या नावे आणि मालकीची असलेली ०-३२-५० इतक्या क्षेत्रफळाची जमीन माझे मालकीची असलेली परवानगी मिळवून गुंठे कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणचाही गहाण, दान, बोजा, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, टस्टी, पोटगी, वारसा, भाडेपटटा, वहीवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने, कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकतीसंदर्भात माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

उरण
दि.२६/११/२०२५

सही/-
**श्री.प्रसाद एन. पाटील**
**ॲडव्होकेट**

**ए-विंग, ४०३, तुलसी सोनाटा, चॅनल उपवन जवळ, साईनगर (प.), पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, पिनकोड-४१०२०६**
**मो.नं.९७०२०८२६६९**

## जाहीर नोटीस

धानसर, तालुका पनवेल, सर्व तमाम लोकांस जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येत आहे की, मौजे धानसर, जिल्हा रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, ताबेकब्जा, वहिवाटीतील तसेच त्यांचे नांवे सातबारा सदरी नोंद असलेली मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त नोंदणीपूर्वी सदर मिळकतीमधील मूळ मालक यांचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - धानसर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड**

| भोगवटादाराचे नांव | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १) श्री. वसंत राघो पोरजी<br>२) श्री. सदाशिव राघो पोरजी<br>३) श्री. जगन्नाथ राघो पोरजी<br>४) श्री. शरद राघो पोरजी<br>५) श्री. दामोदर राघो पोरजी | ६८/२ | ०-३५-९० | ३.७५ |
| | पैकी लिहून देणार यांच्या हिश्श्यातील क्षेत्र | ०-११-९० | १.२४ |

सदरहू जागा, जमिन व सदर मिळकतीसंबंधी अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, मालकी हक्क, हितसंबंध असलेल्य व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधितांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष, तोंडी तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हितसंबंध हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती/तकारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.२५/११/२०२५

सही/-
**ॲड.शेखर ज. खोपकर**
**१८ पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, आहाकांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की ,आमचे अशिल (१) श्री दिनेश सोपान बोरकर हावरे ग्रीन पार्क सहजीवन सोसायटी डी ३ ग्राउंड फ्लोअर प्लॉट न १५ गाळा नंबर सी १ सेक्टर १० कामोठे २२ याची खालील वर्णनाची मिळकत स्वतःच्या मालकीची आहे.

**मिळकतीचे वर्णन**

हावरे ग्रीन पार्क सहजीवन सोसायटी डी ३ ग्राउंड फ्लोअर प्लॉट न १५ गाळा नंबर सी १ सेक्टर १० कामोठे २२, रूम नंबर १०३/सी २, हावरे ग्रीन पार्क सहजीवन प्लॉट नंबर १५ सेक्टर २२ कामोठे नवी मुंबई

त्यानंतर वरील मिळकतीचे मुळ कागद पत्रे आमच्या अशिलांच्या ताब्यात होते. आमचे अशिल सदर मिळकतीचे कायदेशीर मालक आहेत. सदर मिळक्तीचे खालील कागदपत्रे आमचे अशिल यांच्या कडुन गहाळ झाले आहेत. (१) Original Share Certificate

त्याबाबत आमच्या आशिलांनी पनवेल पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे, त्याचा नंबर ००८८/२०२५ दिनांक २५/११/२५ असा आहे.

तरी याबाबत कोणत्याही व्यक्तीस कागदपत्रे आढळल्यास खालील पत्यावर कागद पात्रसाहित ८ दिवसाच्या समक्ष भेटावे.

ठिकाण : पनवेल
दि.२५/११/२०२५

सही/-
**श्री दिनेश सोपान बोरकर**
**कामोठे नवी मुंबई**

अर्जदाराचे वकील
श्री.सचिन बाबुराव कांबळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१३६६/२०२५
नि.नं.१२/ड
ने.ता.०६/०१/२०२६

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात१) श्री सोपान आत्माराम पाटील
वयः ४४, धंदाः नोकरी
२) श्री निवृत्ती आत्माराम पाटील
वयः ३८. धंदाः व्यवसाय,
३) सौ. सारीका जयेश सुतार
वयः ४०, धंदाः नोकरी
१ ते ३ राहणारः मु.शिरवणे गाव, सेक्टर नं.०१, शिरवणे, जोमा बामा सुतार मार्ग, नेरुळ, ताः, जिःठाणे, नवी मुंबई-४००७०६.
४) सौ. साधना संतोष पाटील
वयः ४१, धंदाः गृहिणी
राहणारः गावठाण गांव, चिर्ले-जासई, ता. उरण, जि.रायगड, ४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

सदर प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशीत करणे आवश्यक असलेमुळे सर्व लोकांस असे कळविणेत येत आहे की, स्व. काळुबाई आत्माराम पाटील हे दिनांक ११/०८/२०२३ रोजी नेरुळ, नवी मुंबई, येथे मृत्यू पावले आहेत. मृत्यूसमयी व आजमितीस त्यांचे वडिलांचे म्हणजेच बामा बुध्या पाटील यांचे नावे असलेली मौजे खारघर, तालुकाः पनवेल, जिल्हाः रायगड येथे पुढील वर्णनाच्या मिळकती सरकारतर्फे भुसंपादीत झाल्या आहेत.

**मौजे : खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|
| १ | १९१ | १ | ०-२८-७ | खारघर/२७२ |
| २ | १९१ | ५ | ०-०२-० | खारघर/२७२ |
| ३ | १९३ | ४ | ०-२९-० | खारघर/२७२ |
| ४ | २१० | १ | ०-२६-५ | खारघर/२७२ |
| ५ | २१३ | १ | ०-९४-० | खारघर/२७२ |
| ६ | २१३ | २ | ०-१२-० | खारघर/२७२ |
| ७ | ११८ | १२ | ०-०२-६ | खारघर/२७२ |
| ८ | २८२ | १ पी | ०-२९-० | खारघर/२७२ अे |
| ९ | १३ | १+२ बी | ०-३७-० | खारघर/२७३ |
| १० | १३ | १+२ अे | ०-१३-३ | खारघर/२७३ अे |

सदर मिळकतीबाबत शासकीय योजनेप्रमाणे साडेबारा टक्के भुखंड मिळणार आहेत. सदर मिळकतीतील स्व. काळुबाई आत्माराम पाटील यांचे १/६ हिश्श्याचे कायदेशीर वारस म्हणून वरील अर्जदारांची नोंद होणेकरिता आवश्यक असलेला वारस दाखला मिळणेसाठी सदरचा चौकशी अर्ज नं. १३६६/२०२५ नामदार कोर्टात दाखल केला आहे.

तरी वर उल्लेख केलेले मिळकती संबंधी इतर कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी स्वतः किंवा त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रकाशीत झालेपासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या कोर्टात हजर रहावे.

जर कोणी वर उल्लेख केलेप्रमाणे हजर राहून हरकत न घेतलेस सदर न्यायालय वरील अर्जाचे संदर्भात योग्य तो हुकूम करील.

माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी आज तारीख २५ माहे सन २०२५ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

ॲड.मच्छिंद्रनाथ घरत

## जाहीर नोटीस

उरण येथील मे. दिवाणी न्यायाधिश (क. स्तर) यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.३११/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०१/२०२६

कै. सोनाबाई बाळकृष्ण घरत मयत तर्फे कायदेशीर वारस
१) श्री. संजय बाळकृष्ण घरत
वय - ६२ वर्षे, व्यवसाय- शेती/नोकरी
रूम नं. २, प्लॉट नं. २००, राधा कृष्ण मंदीरा जवळ, सेक्टर १२, नवी मुंबई, वाशी, ठाणे ४००७०३
२) श्री. सुनिल बाळकृष्ण घरत
वय- ६० वर्षे, व्यवसाय- शेती/नोकरी
पत्ता- ८६२ साई नगर, अंबिका वाडी जवळ, नागाव, ता. उरण, जि. रायगड ४००७०२
३) श्री. हरेश बाळकृष्ण घरत
वय- ५६ वर्षे, व्यवसाय- शेती/नोकरी
पत्ता- फ्लॅट नं. ५०२, ५ फ्लोर, सिग्रेचर रेसिडेन्सी, प्लॉट नं. ११८, सेक्टर ४८, द्रोणागिरी, बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड ४००७०२
४) श्री. जयेश बाळकृष्ण घरत
वय वर्षे, व्यवसाय- शेती/नोकरी
पत्ता- सावरखार, ता. उरण, जि. रायगड

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ह्या जाहीर नोटिसीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, ज्यापेक्षा कै. सोनाबाई बाळकृष्ण घरत (मयत) हे दिनांक १६/०९/२०२४ रोजी मु. सावरखार, ता. उरण, जि. रायगड येथे मयत झाल्या आहेत. मृत्यूपूर्वी कै. सोनाबाई बाळकृष्ण घरत (मयत) यांच्या एकत्र कुटुंबाच्या व मालकी हक्काच्या जमीन मिळकती मौजे : नवघर, ता. उरण, जि. रायगड येथे आहेत. सदर मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावे वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्या संपादित जमिन मिळकतींचे वर्णन पुढीलप्रमाणे;

**संपादित जमीन मिळकतिचे वर्णन**
**मौजेः नवघर, ता. उरण, जि. रायगड**

| गावाचे नाव व अवॉर्ड क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|
| नवघर २८/८५ | ९८ | १० | ०-०२-०० | ०.२५ |
| | १४४ | ८ | ०-०६-०८ | १.२० |
| | १७४ | ६ (२) | ०-०१-१२ | ०.१६ |
| नवघर ३९२ अ/८५-८६ | ६ | ३ | ०-०३-०४ | ०.४१ |
| | ११८ | २ (१) | ०-०२-०८ | ०.३३ |
| | १२६ | ४ | ०-०९-०० | १.०६ |
| | १३३ | १२ | ०-०५-०४ | १.६६ |
| | १०१ | ५ | ०-००-१२ | ०.०६ |
| | ३ | ८ | ०-०८-०० | १.१९ |
| | २७६ | ३ | ०-०६-१२ | ०.६८ |
| | २७७ | १० | ०-०२-०० | ०.१६ |
| | २८१ | ७ | ०-०४-०४ | ०.४४ |
| | ५६ | १२ (१) | ०-०२-०२ | ०.२७ |
| | २७९ | ९ (१) | ०-०२-०६ | ०.२५ |
| | २८१ | ८ | ०-०५-०४ | ०.६६ |
| | १७४ | ६ (१) | ०-०६-०८ | ०.३७ |
| | १३४ | ९ | ०-०४-०० | ०.५६ |
| | ५ | ४ | ०-०५-०० | ०.६९ |
| | २७९ | २ (१) | ०-००-१२ | ०.१३ |
| नवघर ३९२ ब/८५-८६ | १२१ | १५ (१) | ०-०६-०८ | ०.८७ |
| | ४६ | ३ (१) | ०-१४-१२ | २.२५ |
| | ७० | ४ (१) | ०-०४-१० | ०.७८ |
| | ११० | २ (१) | ०-०९-०८ | १.२८ |
| १ | ११० | १० (१) | ०-०४-१२ | ०.६६ |
| | १९ | ५ | ०-१०-०० | १.४५ |
| नवघर ३९२/८३-८४ | ८४ | १२ (१) | ०-०२-०० | ०.२५ |
| | ८९ | ११ (१) | ०-०३-०० | ०.३८ |
| | ९५ | ३ (२) | ०-०३-१० | ०.५३ |

सदरहू अर्जदार मयताचे कायदेशीर वारसदार नव्हे असे कोणास सांगायचे असेल तर ह्या जाहीर नोटिसच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत कै. सोनाबाई बाळकृष्ण घरत (मयत) यांचे वारस असल्यास सर्टिफिकेट देईल, तारीख २० माहे ११ सन २०२५

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

# स्मार्ट कार्डची प्रतीक्षा कायमच

## एसटीचे हायटेक कामकाज फक्त कागदावरच

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

एसटी महामंडळाने हायटेक होत कागदी पासच्या जागी स्मार्ट कार्डची योजना राज्यात राबविली. मात्र, नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे महामंडळाचा कारभार चालला असल्याचे दिसून आले आहे. मागील तीन वर्षापासून ही योजना बंद पडली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह नियमीत एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना स्मार्टकार्डची प्रतिक्षा कायमच असून, एसटीचे पासचे कामकाज कागदाच्या भरोवश्यावरच चालत आहे.

ज्येष्ठ नागरिकांना एसटीतून प्रवास करताना, तहसील कार्यालयातील मिळणाऱ्या ज्येष्ठ नागरिक दाखल्याच्या आधारे एसटीची सवलत पुर्वी मिळत होती. त्यानंतर आधारकार्डमार्फत सवलत देण्यास सुरुवात केली. मात्र, हे कार्ड हाताळ-गहाळ होण्याची भिती अधिक होती. त्यात खराब होण्याची शक्यताही होती. एसटी महामंडळाने ६५ वर्षे पुर्ण असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र म्हणून स्मार्ट कार्ड देण्याचा निर्णय घेतला. बस आगारातील आरक्षण कक्षामध्ये त्यासाठी स्वतंत्र कार्यालय सुरु करण्यात आले. स्मार्टकार्ड नोंदणी केल्यानंतर एक ते दोन




ताना महिन्यानंतर स्मार्टकार्ड देण्याची व्यवस्था करण्यात आली. एसटी महामंडळाच्या या उपक्रमाला ज्येष्ठ नागरिकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. एसटीचे स्मार्टकार्ड दाखवून ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध झाली. तसेच एसटीतून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसह अन्य पासधारक प्रवाशांनादेखील स्मार्ट कार्ड देण्यास सुरुवात केली.

कागदी पासच्या जागी स्मार्टकार्ड आल्याने विद्यार्थी व अन्य प्रवासीदेखील आनंदी झाले. आठ वर्षापुर्वी सुरु झालेली स्मार्टकार्ड योजना गेल्या तीन वर्षापासून बंद पडली आहे. ज्या कंपनीला स्मार्ट कार्ड तयार करण्याचे काम दिले होते. त्याच कंपनीच्या तांत्रिक कामांमध्ये बिघाड झाला. सर्व्हरची समस्या निर्माण झाली. त्यामुळे नव्याने स्मार्टकार्ड काढण्यास अडचण निर्माण झाली. मुदत संपलेल्या कार्डचे नुतनीकरणही करणे ही थांबले. २०१६ पासून स्मार्ट कार्ड योजना सुरु केली. एटीएम कार्डसारखे अद्ययावयत असे स्मार्टकार्ड हेच विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक व अन्य पासधारकांसाठी एसटी बस पासमधील ओळ-खपत्र बनले होते ते ओळखपत्र स्कॅन केल्यावर नोंदणी मशीनमध्ये केली जात होती. मात्र स्मार्ट कार्ड मिळणे बंद झाले आहे. त्यामुळे सध्या आधारकार्ड व कागदी पासच्या भरोवश्यावरच विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करावा लागत आहे.

# तळा-अलिबाग एसटी बंद झाल्याने प्रवाशांचे हाल

**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा ।** तळा तालुक्यातील शेकडो प्रवाशांना अलिबाग येथे जाण्यासाठी एसटीचा मोठा आधार आहे.मात्र गेल्या काही दिवसांपासून सदरील एसटी सेवा बंद झाल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत.त्यामुळे सदरील एसटी सेवा सुरू करण्यात यावी,अशी मागणी प्रववासीवर्गाकडून केली जात आहे.तळा तालुक्यातून अलिबाग येथे नोकरदार, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने दररोज कामासाठी एसटीच्या माध्यमातून ये जा करत असतात.तालुक्यातील प्रवाशांना या एसटीचा पर्याय होता सकाळी आणि संध्याकाळ अशी दोन वेळा ही एसटी सेवा सुरू होती.

या मार्गावर अनेक प्रवासी दररोज प्रवास करत असल्याने प्रशासनाला उत्पन्न देखील चांगले मिळत होते तळा येथून मेंढा,टोकार्डे,पढवण वाली,रोहा, रामराज मार्गे जाणारी ही गाडी बंद झाल्याने अनेकांना इंदापुरमार्गे कोलाड नागोठणे वडखळ ,पुढे पोयनाड असा सरळ प्रवास करावा लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.तळा ते रोहा थेट रिक्षा सेवा सुरू नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे एसटी प्रशासनाने तळा रोहा अलिबाग एसटी पुन्हा एकदा सुरू करून सर्वसामान्यांचे हाल थांबवावेत अशी प्रवाशांनी मागणी केली आहे.

तळा अलिबाग एस् टी बस नियमित




चालणारी उत्तम उत्पन्न देणारी आहे. अलिबाग हे जिल्ह्याचे मुख्यालय असल्याने तेथे जाणारी ही एकमेव बस आहे.रोहा अलिबाग मार्गावरील पुलाचे दुरुस्तीचे काम सुरू असल्याने ही बस बंद करण्यात आली असल्याचे समजते. सदर बस रोहा पर्यंत चालवून सद्यस्थितीत रामराज मार्गाने बंद करून रेवदंडा साळाव मार्गाने सुरु करून प्रवाशांचे होणारे हाल थांबवावे अशी मागणी होत आहे.

तळा पंचक्रोशीतील प्रवाशांना इंदापूर, वडखळ अलिबाग असा प्रवास करावा लागत आहे. तसेच वेळेचा अपव्यय व आर्थिक नुकसान सहन करावे लागते. वेळेत पोहोचता येत नाही. व ग्रामीण भागातील प्रवासी, विद्यार्थी,जेष्ठ नागरिकांना स्वगृही पोहोचायला वेळ होतो.सदर बस बंद ठेवून तोटाच होत असताना अधिकाऱ्याच्या भोंगळ कारभारावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहेत. प्रवाशांकडून याबाबतीत रोष व्यक्त केला जात आहे. तरी विभागीय नियंत्रक अधिकारी यांनी त्वरीत लक्ष घालून तळा अलिबाग सद्या रेवदंडा साळाव किंवा नागोठणे पोयनाड मार्गाने सुरु करावी अशी मागणी केली जात आहे.

# निवडणुकीत आदर्श आचारसंहितेचे योग्य पालन होईल : संजय दराडे

**दै.रायगड नगरी । रवींद्र कुवसेकर**

**उतेखोल/माणगाव ।** रायगड जिल्ह्यात दहा नगरपंचायत, नगरपालिका निवडणुका पार पडत आहेत.

येत्या दिनांक २ डिसेंबरला निवडणुका पार पडत असून दिनांक ३ तारखेला निकाल घोषित होणार आहेत. आदेश आचारसंहिता लागू असून निवडणूक कालावधीत आदेश आचारसंहितचे योग्य पालन केले जाईल असे कोकण विभाग पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी आढावा दौऱ्यनिमित माणगाव येथील पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे..

नगरपंचायत, नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने कोकण विभाग पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी दिनांक २५ नोव्हेंबर रोजी आढावा दौऱ्यानिमित्त माणगाव शासकीय विश्रामगृह माणगाव येथे पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की, रायगड जिल्ह्यातील दहा नगरपंचायत, नगरपालिका हद्दीत आदर्श आचारसंहिता सुरू आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा सुव्यवस्था राखण्याबाबत पोलीसांवर महत्वाची जबाबदारी आहे.

त्या अनुषंगाने लागणारा बंदोबस्त व करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत जिल्ह्यातील अधिकाऱ्यांसोबत संवाद साधून मार्गदर्शन आढावा दौरा करीत आहे.

संवेदनशील ठिकाणी तसेच आचारसंहिता लागू असणाऱ्या ठिकाणी पोलिसांची करडी नजर असून निवडणूक आचारसंहिता योग्य रीतीने पार पडेल. यावेळी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या समवेत जिल्हा पोलीस अधिकारी व माणगांवचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे उपस्थित होते.

# ३५ वर्षानंतर मिळाला तडजोडीने न्याय

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत दिवाणी कोर्टातील सर्वात जुना दावा अशी ख्याती असलेला दिवाणी दावा नं.३८/१९९१ वाळकु खारीक वगैरे विरुद्ध बाळू खारीक वगैरे हा कर्जत तालुक्यातील शेलू गावातील जमिनीबाबतचा भावकीतील वाटपाचा दावा अखेर ३५ वर्षांनंतर तडजोडीने मिटला. या दाव्याच्या कामी वादी तर्फे ॲड.विवेक पेठे तर प्रतिवादी तर्फे ॲड.संदीप बागडे व ॲड.अक्षय पेमारे यांनी कामकाज पाहिले.

वर्षानुवर्षांची दोन पिढ्यांची एकमेकांबद्दल मनात द्वेषभावना असल्याने वादी प्रतिवादी हे तडजोडीपर्यंत कधी आले नव्हते. मात्र या दाव्याच्या कामी मयत प्रतिवादीचे वारस श्रीमती शकुंतला बाळू खारीक व नारायण बाळू खारीक यांच्या वतीने ॲड.संदीप बागडे हजर झाल्यानंतर ॲड. संदीप बागडे यांनी या दाव्याच्या सुनावणीच्या अंतरिम युक्तिवादानंतर मा. न्यायालयाला विनंती केली की, वादी, प्रतिवादी हे एकाच कुटुंबातील असून वादी, प्रतिवादी आणि मी एकाच गावातील रहिवासी आहोत. या दाव्यात आजपावेतो तीन पिढ्या समाविष्ट झाल्या आहेत. या दाव्यामुळे वादी प्रतिवादी गेली अनेक वर्षे एकमेकांशी बोलत नाहीत. तसेच या दाव्यात तडजोड न झाल्यास या दाव्याच्या निकालानंतर अंतिम निर्णयाने व्यथित पक्षकार वरिष्ठ न्यायालयात जातील. व या दाव्याच्या प्रवास जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय असा होऊन अंतिम निर्णय होण्यास अजून १५ वर्षे नक्कीच जातील.

मग अशावेळी या दाव्याचा अंतिम निर्णय होण्यास जर ५० वर्षे लागत असतील तर इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर या दाव्यातील पक्षकारांना खरा न्याय मिळेल का? आणि त्यामुळे आजोबांनी दाखल केलेल्या दाव्याचा निकाल नातवाने घ्यायचा हा न्याय व्यवस्थेला लागलेला दोष कधीच पुसला जाणार नाही. त्यामुळे माननीय न्यायालयाला विनंती आहे की हे प्रकरण तडजोडीने मिटण्यासाठी प्रयत्न व्हावेत. आणि त्यानुसार मा. न्यायालयाने ॲड. बागडे यांना या दाव्याच्या तडजोडीबाबत विशेष प्रयत्न कराण्यास सांगितले.

ॲड.बागडे यांनी केलेल्या प्रयत्नांना वादी दामू खारीक वगैरे, प्रतिवादी शकुंतला खारीक वगैरे व वादींचे वकील ॲड. विवेक पेठे यांनी सहकार्य केल्यामुळे अखेर हा दावा ३५ वर्षांनी तडजोडीने मिटला व वादी प्रतिवादींना ३५ वर्षांनंतर खरा न्याय मिळाला. या तडजोडीच्या निर्णयाने व ३५ वर्षानंतर या दाव्याची सुनावणी थांबल्याने दोन्ही पक्षकार समाधान व्यक्त करीत आहेत.

# अनिकेत तटकरे यांचे आव्हान स्वीकारून मी आज हरिहरेश्वरच्या दर्शनासाठी आलो आहे : ना भरतशेठ गोगावले

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

महाराष्ट्र राज्याचे फलोत्पादन, रोजगार हमी व खारभूमी विकास मंत्री भरतशेठ गोगावले यांनी नुकताच श्रीवर्धन तालुक्याचा दौरा केला. यावेळी माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी आपल्याला हरिहरेश्वरला येण्याचे आव्हान दिले होते, ते स्वीकारून मी आज हरिहरेश्वर येथे श्री हरीहरेश्वराचे व काळभैरवाचे दर्शन घेऊन राज्यातील नगरपरिषद निवडणुकांमध्ये शिवसेना पक्षाला चांगले यश मिळावे असे साकडे घातले आहे. श्रीवर्धन नगर परिषदेत देखील शिवसेनेची सत्ता बसावी असे देखील साकडे आपण देवासमोर घातले आहे.

यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांवरती ना. भरत शेठ गोगावले यांनी उत्तरे दिली. श्रीवर्धनच्या विकास आराखड्याबाबत गोगावले यांना प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी आपापल्या मतदारसंघात ज्याला जे शक्य होईल ते केले आहे. श्रीवर्धन मध्ये आमची सत्ता बसली तर आम्ही देखील महाड प्रमाणे श्रीवर्धन चा विकास करू, असे आश्वासन दिले. तर रायगडच्या पालकमंत्री पदाचा तिढा केव्हा सुटणार या प्रश्नावरती उत्तर देताना आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकां नंतर हा प्रश्न मार्गी निघेल. असे वक्तव्य केले.




तर जीवना बंदर या ठिकाणी होत असलेल्या जेट्टीच्या कामामुळे मोठ्या प्रमाणात भराव झाल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारी पाण्याची पातळी खूप मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. याबाबत आपण योग्य ती चौकशी करू असे सांगितले. श्रीवर्धन नगरपरिषद हद्दी मध्ये झालेला जलशुद्धीकरण प्रकल्प व जलवाहिन्या बदलण्याचे काम याबाबत देखील नागरिकांनी विच-ारणा केली. त्यानंतर ना. भरत शेठ गोगावले यांनी श्रीवर्धन नगरपरिषदेतील सर्व प्रभागांमध्ये उभ्या असलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांना मार्गदर्शन केले.

सदर दौऱ्याचे वेळी जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, श्रीवर्धनचे तालुकाप्रमुख सुरेश मिरगळ, उपतालुका प्रमुख ओमकार शेलार, युवा सेना जिल्हाप्रमुख उभारे यासह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे साईभक्तांना टी-शर्ट

# साईबाबांच्या मानाच्या उरणच्या पालखीला महेंद्रशेठ घरत यांचा खांदा



**दै.रायगड नगरी । उलवे**

उरण येथील श्री साई सेवा मंडळाच्या मानाच्या पालखीची यथोचित पूजा मंगळवारी महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते दत्त मंदिरात करण्यात आली. यावेळी आरतीचा मानही साई भक्तांनी महेंद्रशेठ घरत यांना दिला. त्यानंतर श्री साई सेवा मंडळातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, मी गेली ३८ वर्षे शिर्डीला न चुकता जातोय. १९८७ मध्ये मी न्हावायार्डला कामाला लागतात पहिल्यांदा एसटीने शिर्डीला गेलो होतो. तेव्हापासून साईबाबांचा आशीर्वाद मला मिळतोय. त्यामुळे सर्वच दिंड्यांना अनेक वर्षांपासून मी सढळ हस्ते मदत करतोय. साईबाबांचा आशीर्वाद माझ्या मागे कायम आहे. मी साईभक्त असल्यामुळेच माझ्या शेलघरमध्ये भव्यदिव्य साई मंदिर बांधतोय. ते काम लवकरच पूर्ण होईल. त्यासाठी मी जिवाचा आटापिटा करतोय. साईबाबांनी आपल्याला श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला. माझी वाटचाल त्याच मार्गाने सुरू आहे. उरणमधून २५ वर्षांपूर्वी सुरू झालेली पालखीची परंपरा अखंड चालत राहावी, म्हणून मी दरवर्षी पालखीला येतो आणि मदतही करतो. कडक उन्हाळ्यात साईभक्तांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून साईबाबांकडे उरणच्या साईभक्तांसाठी सुखरूप प्रवासासाठी प्रार्थना करतो आणि मनापासून शुभेच्छा देतो. साईभक्तांनी मला आरती आणि पूजेचा मान दिल्याने मी धन्य झालो आहे.

मंगळवारी उरणमधून हजारो साईभक्त साईबाबांची पालखी घेऊन सकाळी साडेनऊच्या सुमारास पायी दिंडीने शिर्डीला निघाले. तेव्हा साईंच्या पालखीला महेंद्रशेठ यांनी खांदा दिला. यावेळी उरणच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार भावना घाणेकर उपस्थित होत्या.

साईबाबांची पालखी श्री साई सेवा मंडळ उरण काढते. त्यांचे यंदा पालखीचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे, ही गौरवास्पद बाब आहे. त्यांचा आदर्श घेऊन उरण परिसरात शिर्डीला पायी दिंडीने निघण्याची परंपरा सुरू झाली आहे. त्यामुळे त्यांचा हा आदर्शवत प्रवास आहे, असेही आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी साईबाबांच्या पालखी प्रस्थानावेळी आपले मत व्यक्त केले.

यावेळी साईंच्या चरणी पायी दिंडीद्वारे शिर्डीला जाणाऱ्या तरुणांना महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे टी-शर्ट देण्यात आले आहेत. गेल्या चार वर्षांपासून टी-शर्ट देण्याचा उपक्रम महेंद्रशेठ घरत यांनी सुरू ठेवला आहे. यावेळी एम. जी. ग्रुपचे सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री साई सेवा मंडळाचे अध्यक्ष सतीश पाटील, कार्याध्यक्ष चंद्रकांत म्हात्रे, सेक्रेटरी जगदीश कडू, खजिनदार अमित कडू आणि मंडळाचे सदस्य, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. साईनामाच्या गजरात उरणहून पालखी निघाली असून ३ डिसेंबरला शिर्डीला पोहोचेल.

# कर्जत नगरपरिषद हद्दीत कर्जत पोलिसांचा रूट मार्च



**दै.रायगड नगरी । संजय गायकवाड**

**कर्जत ।** कर्जत नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्जत पोलीस ठाण्याच्यावतीने कर्जत नगरपरिषद हद्दीत रूट मार्च काढण्यात आला होता

काल दि.२४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी कर्जत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने पोलीस मैदान कर्जत येथे दंगा काबू योजना रंगीत तालीम घेण्यात आली त्यानंतर नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्या करिता तसेच कर्जत नगरपरिषद निवडणूक भयमुक्त वातावरणात शांततेत पार पाडण्याच्या दृष्टीने कर्जत पोलीस ठाणे -डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक- कर्जत नगरपरिषद- पाटील आळी- डेक्कन जिमखाना- जकात नाका- कर्जत मुख्य बाजारपेठ- श्री कपालेश्वर मंदिर- महावीर पेठ- आमराई नाका ते कर्जत पोलीस ठाणे असा रूटमार्च काढण्यात आला होता. सदर दंगा काबू योजना व रूट मार्चकरिता कर्जत पोलीस ठाणे कडील ६ अधिकारी १५ पोलीस अंमलदार, तसेच आर सी पी प्लाटून कर्जतचे १ अधिकारी १८ पोलीस अंमलदार उपस्थित होते.